# कल्याण महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, कल्याण.

मुख्य कार्यालयः शंकरराव चौक, महानगरपालिका मुख्यालय समोर, कल्याण (पश्चिम) ४२१३०१
**Gmail Add:** kalyandombivlitransport@gmail.com

## जाहिरात

कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि. च्या विवक्षित कामांसाठी बेस्ट किंवा राज्य मार्ग परिवहन महामंडळ मधील प्रदिर्घ अनुभव असलेले **सेवा-निवृत्त** अधिकाऱ्यांच्या सेवा निव्वळ ठोक मानधन तत्वावर "**करार पध्दतीने**" घेणेकामी **सेवा-निवृत्त** झालेल्या अधिकारी यांचेकडून खालील पदांकरिता दिनांक २५/०६/२०२६ ते दिनांक ०६/०७/२०२६ या कालावधीत अर्ज मागविणेत येत आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | वाहतुक व्यवस्थापक | – ०१ | (२) | यंत्र अभियंता (चालन) | – ०१ |
| (३) | प्रशासकीय अधिकारी | – ०१ | (४) | लेखाधिकारी (वरिष्ठ) | – ०१ |
| (५) | लेखा परिक्षक (वरिष्ठ) | – ०१ | (६) | व्यवस्थापकीय अधिकारी (I.T.) | – ०१ |
| (७) | स्थापत्य अभियंता | – ०१ | (८) | आगार व्यवस्थापक | – ०४ |
| (९) | सहा.वाहतूक अधिक्षक | – ०४ | (१०) | वाहतूक निरीक्षक | – ०४ |

इच्छुक उमेद्वारांनी कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि. मुख्यालय, शंकरराव चौक, कल्याण (प.) येथे दिलेल्या नमुन्यामध्ये विहित मुदतीत वैयक्तिक/रजिस्टर एडी/स्पीड पोस्ट किंवा ऑनलाईन पध्दतीने kalyandombivlitransport@gmail.com या ई-मेल आय.डी. वर अर्ज सादर करावेत. सदर अर्जाचा नमुना, जाहिरात तसेच अटी व शर्तीबाबतची अधिक माहिती महानगरपालिकेच्या www.kdmc.gov.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेद्वारांना समक्ष मुलाखतीस बोलविण्यात येईल.

**स्वाक्षरी/–**
**(डॉ. विजयकुमार द्वासे)**
**संचालक तथा सचिव**
कल्याण महानगर परिवहन महामंडळ
मर्यादित, कल्याण.

# कल्याण महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, कल्याण.

मुख्य कार्यालयः शंकरराव चौक, महानगरपालिका मुख्यालय समोर, कल्याण (पश्चिम) ४२१३०१
**Gmail Add:** kalyandombivlitransport@gmail.com

जा.क्र./कडोंमपाप्रमाप/परि/मुका/34
दिनांक :-23/06/२०२६

**-: प्रवर्ग निहाय अर्हता, अनुभव, अटी व शर्तीः-**

कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि. च्या विवक्षित कामांसाठी बेस्ट किंवा राज्य मार्ग परिवहन महामंडळ मधील प्रदिर्घ अनुभव असलेले **सेवा-निवृत्त** अधिकाऱ्यांच्या सेवा निव्वळ ठोक मानधन तत्वावर "**करार पध्दतीने**" घेणेकामी **सेवा-निवृत्त** झालेल्या अधिकारी यांचेकडून खालील पदांकरिता दिनांक २५/०६/२०२६ ते दिनांक ०६/०७/२०२६ या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**करार पध्दतीने घेण्यात येणाऱ्या सेवा निवृत्त अधिकाऱ्यांचा तपशील खालील प्रमाणे.**

| अ. क्र. | अधिकारी पद | पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | वाहतुक व्यवस्थापक | ०१ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी व व्यवसाय व्यवस्थापनातील पदवी.<br>२. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमध्ये वाहतूक विभागामधील वरिष्ठ वाहतूक अधिकारी पदावरील वाहतूक व्यवस्थापनाचा किमान १० वर्षाचा अनुभव. |
| २ | यंत्र अभियंता (चालन) | ०१ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची यंत्र अभियांत्रिकी शाखेतील पदवी.<br>२. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमध्ये यंत्र अभियांत्रिकी विभागामधील वरिष्ठ अधिकारी पदावरील किमान १० वर्षाचा अनुभव. |
| ३ | प्रशासकीय अधिकारी | ०१ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी.<br>२. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमधील प्रशासन विभागातील आस्थापना पर्यवेक्षक व प्रशासकीय अधिकारी पदाचा किमान १० वर्षाचा एकत्रित अनुभव. |
| ४ | लेखाधिकारी (वरिष्ठ) | ०१ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील पदवी.<br>२. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमध्ये लेखा विभागामधील लेखापाल व लेखा अधिकारी पदावरील किमान १० वर्षाचा एकत्रित अनुभव. |
| ५ | लेखा परिक्षक (वरिष्ठ) | ०१ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेतील पदवी.<br>२. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमध्ये लेखा परिक्षण विभागातील लेखापाल व लेखा परिक्षक पदावरील किमान १० वर्षाचा एकत्रित अनुभव. |

| अ. क्र. | अधिकारी पद | पद संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| ६ | व्यवस्थापकीय अधिकारी (I.T.) | ०१ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची माहिती व तंत्रज्ञान शाखेतील कोणतीही पदवी.<br>२. माहिती तंत्रज्ञान, संगणक विज्ञान किंवा सॉफ्टवेअर अभियांत्रिकी या क्षेत्रातील अनुभव आवश्यक. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील बी. एस. प्रोग्रामिंग, डेटा व्यवस्थापन, नेटवर्किंग, मोबाईल सिस्टम, ए.आय. तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षा यासह संगणक नियोजन संबंधी आय.टी. क्षेत्रातील विशेष प्राविण्य.<br>३. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमधून सेवा निवृत्त झालेल्या उमेद्‌वारांना प्राधान्य देण्यात येईल. |
| ७ | स्थापत्य अभियंता | ०१ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी.<br>२. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमध्ये स्थापत्य विभागामधील स्थापत्य अभियंता व अधिकारी पदावरील किमान १० वर्षाचा एकत्रित अनुभव. |
| ८ | आगार व्यवस्थापक | ०४ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी.<br>२. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमध्ये वाहतूक विभागामधील सहा.वाह. अधिक्षक व आगार व्यवस्थापक या पदावरील किमान १० वर्षाचा एकत्रित अनुभव. |
| ९ | सहा. वाहतूक अधिक्षक | ०४ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी.<br>२. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमध्ये वाहतूक विभागामधील वाहतूक निरीक्षक व सहा.वाहतूक अधिक्षक या पदावरील किमान १० वर्षाचा एकत्रित अनुभव. |
| १० | वाहतूक निरीक्षक | ०४ | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी.<br>२. बेस्ट परिवहन उपक्रम अथवा राज्य मार्ग परिवहन महामंडळमध्ये वाहतूक विभागामधील सहा.वाहतूक निरीक्षक व वाहतूक निरीक्षक या पदावरील किमान १० वर्षाचा एकत्रित अनुभव. |

**सबब, उपरोक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या सेवा निवृत्त उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी अर्ज स्विकारुन प्रत्यक्ष मुलाखतीद्‌वारे निवड करण्याचे प्रस्तावित आहे.**

❖ **प्रस्तावित अटी व शर्ती :**

१) इच्छुक उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव, सेवा निवृत्ती आदेश व आवश्यक कागदपत्रांच्या प्रतींसह विहित नमुन्यातील अर्ज, मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, KMPML यांचे नावे कल्याण डोंबिवली महानगरपालिका, परिवहन उपक्रम मुख्यालय, महापालिके-समोर, शंकरराव चौक, कल्याण (पश्चिम) या ठिकाणी, जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकापासून ते दिनांक ०६/०७/२०२६ रोजीपर्यन्त कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा पध्दतीने वैयक्तिक/ रजिस्टर-एडी/स्पीड-पोस्ट किंवा ऑनलाईन पध्दतीने kalyandombivlitransport@gmail.com या ई-मेल आय.डी. वर सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत ग्राहय धरले जाणार नाहीत.

२) तपासणी अंती पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी उपस्थित राहणेकरीता ई-मेल द्वारे कळविण्यात येईल. याबाबत लेखी पत्राद्वारे कळविले जाणार नाही.

३) कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेवून करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त ०६ महिन्यांसाठी देण्यात येईल. आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीसाठी पुढे मुदतवाढ देण्यात येईल.

४) ईच्छुक उमेद्वाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी.

५) निश्चित केलेल्या कालावधीत काम पूर्ण करणेच्या हमी बाबत संबंधित उमेदवारास बंधपत्र सादर करावे लागेल.

६) करार पध्दतीने नियुक्ती करणेत आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यन्तच कार्यरत राहू शकतील. तथापी, ज्या व्यक्तींच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे असे मत झाल्यास त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरिष्ठ अधिकाऱ्याच्या/प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवणेबाबतचा अंतिम निर्णय मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचा राहील.

७) सेवा निवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

८) प्रथमतः विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यात येईल व तद्नंतर पात्र उमेदवारांना परिवहन उपक्रम मुख्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, शंकरराव चौक, कल्याण (प.) येथे प्रत्यक्ष मुलाखतीस बोलवण्यात येईल. यासाठी संबधित उमेदवारांनी अर्जामध्ये आपला व्हॉटस् ॲप सुविधा असलेला संपर्क क्रमांक व मेल आय.डी. नमुद करणे आवश्यक राहील.

९) इच्छुक उमेदवारांनी त्यांना अपेक्षित असलेले मानधन अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

१०) इच्छुक उमेदवारांची निवड करत असतांना त्यांची पात्रता, अनुभव विचारात घेवून कोणत्याही श्रेणीतील उमेद्वाराची निवड करण्याचे किंवा नाकारण्याचे तसेच निवडी-अंती नियुक्ती आदेश देण्याचे, अथवा नियुक्ती नंतर सेवा खंडीत करण्याचे अथवा कोणतेही कारण न देता संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचे पूर्ण अधिकार मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, कल्याण महानगर परिवहन महामंडळ मर्यादित, कल्याण यांना राहतील.

**(मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या**
**दिनांक - २२/०६/२०२६ रोजीच्या मान्यतेने)**

**स्वाक्षरी/—**
**(डॉ. विजयकुमार द्वासे)**
**तथा संचालक तथा सचिव**
कल्याण महानगर परिवहन महामंडळ
मर्यादित, कल्याण.

जा.क्र./केएमपीएमएल/परि/मुका/३५, दिनांक २३/०६/२०२६.

-: अर्जाचा नमुना :-

**प्रति,**
**मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,**
कल्याण महानगर परिवहन महामंडळ लि.
शंकरराव चौक, कल्याण (प.)

फोटो

**अर्ज केलेल्या पदाचे नांव :-** ............................................................ **या पदासाठी अर्ज**

**किमान अपेक्षित मानधन रुपये :-** .................................. **अक्षरी रुपये :-** ..................................................

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नांव | |
| २ | कायमचा पत्ता | |
| ३ | व्हॅटस्-ॲप भ्रमणध्वनी क्रमांक (अनिवार्य) | |
| ४ | ई-मेल आय.डी. (अनिवार्य) | |
| ५ | सध्याचा पत्ता | |
| ६ | जन्म तारीख | |
| ७ | जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांक रोजीचे वय | |
| ८ | राष्ट्रीयत्व | |
| ९ | जात/प्रवर्ग | |
| १० | लिंग | |
| ११ | अवगत भाषा | |
| १२ | शैक्षणिक अर्हता | |

उर्वरित मजकुर पाठिमागे...

| १३ | अनुभव : | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | हुद्दा | कार्यालयाचे नांव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

१४) सेवा निवृत्ती दिनांक :—...................................

१५) सेवा निवृत्ती महिन्यातील मुळ वेतन रुपये.................................

१६) सध्या कुठे काम करीत असल्यास त्याचा तपशिल :— ..................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

१७) इतर विशेष उल्लेखनीय कार्य :— ..........................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

**माझी माहिती वर दिलेल्या तपशिलाप्रमाणे सत्य व अचुक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पूर्व सूचने-शिवाय रद्द होईल याची मला जाणिव आहे.**

**ठिकाण :—**

अर्जदाराचे नांव व सही

**दिनांक :—**

...........................................